।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८३

श्रीदासराममहाराजकृत

# सांप्रदायबोध

(विवरणासह)

प्रा. डॉ. के. वा. आपटे

आवृत्ती पहिली सांगली सन २०२०

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८३**

# सांप्रदायबोध (विवरणासह)

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**
द्वारा प्रा. नारायण केशव आपटे
२, श्रीराम पार्क, एस.टी.कॉलनी,
विश्रामबाग, सांगली ४१६४१५
संपर्क : ९४२३८२९५९१

**प्रकाशक :**
श्री. महेश नामदेव शिंगारे
आदिशक्ती अपार्टमेंट फ्लॅट नं. एफ-४,
विसावा चौक, खाडीलकर गल्ली गांवभाग,
सांगली ४१६४१६

**प्रथम आवृत्ती** इ.स.२०२०

**प्रकाशन दिन** : बुधवार दि. ०९.०९.२०२० (प्रा. डॉ. के. वा. आपटे जन्मदिन)
भाद्रपद वद्य ७, शके १९४२

**© सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

**अक्षर जुळणी** :
पॉप्युलर एस.ॲण्ड टी. इन्स्टिट्यूट, सांगली
श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे

**मुद्रक** : एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स, वखारभाग, सांगली

**प्रसाद मूल्य : रु.५०/-**

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

# प्रास्ताविक

श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायातील हनुमंत पांडुरंग ऊर्फ श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे शिष्य होते. ते ''ते सिद्धसाधनाने स्वये ब्रह्मचि झाले'' होते. इ.स. १९३७ साली ते सांगलीतील देसाई डॉक्टरांच्या सांगण्यावरून हवापालटास गेले होते. त्यासाठी सातारा हे गाव ठरले होते. साताऱ्यात असताना २१.०५.१९३७ रोजी श्रीदासराममहाराजांना स्वप्नात श्रीतुकाराममहाराजांनी बोध केला. त्यानंतर ''इतर काही संतांनी आपला बोध माझे मनात करावा'' अशी विनवणी श्रीदासरामांनी केली. त्यानुसार चिमड संप्रदायातील काडसिद्ध, गुरुलिंगजंगम निंबरगीकरमहाराज, रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमडमहाराज, श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज आणि गोविंद ऊर्फ श्रीमामामहाराज केळकर यांनी केलेला बोध श्रीदासराममहाराजांच्या मनात प्रगटला. हे सर्व बोध श्रीदासराममहाराजांनी अभंगांत निबद्ध केले. त्याला ''सद्बोध दशक'' असे नाव दिले. हा सद्बोधदशक ग्रंथ विवरणासह प्रकाशित झाला आहे.

असेच दिवस जात होते. इ.स.१९८४ साली काही कारणांनी चिमड संप्रदायातील संतांचे बोध श्रीदासराममहाराजांचे मनात प्रगट झाले. ते त्यांनी तेरा अभंगांत निबद्ध केले आणि त्यांनी या अभंगसमूहाला ''सांप्रदायबोध'' असे नामाभिधान दिले. या नावात सांप्रदाय शब्दाच्यामागे चिमड हा शब्द अध्याहृत आहे. या सांप्रदायबोधात कोणत्या चिमड संप्रदायातील संतांनी कोणता बोध केला हे मात्र कुठेही सांगितलेले नाही.

सांप्रदायबोधाच्या चौथ्या अभंगात ''हनुमंत'' (श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस), अकराव्या अभंगात ''गुरुलिंगजंगम'' (श्रीनिंबरगीकरमहाराज) आणि तेराव्या अभंगात ''गोविंद'' (मामामहराज केळकर) आणि ''हनुमंत'' तसेच ''रेवणसिद्ध'' ही नावे येतात. पण

त्यावरून त्यांनी अमुक अमुक बोध केला असे काही श्रीदासराममहाराजांनी म्हटलेले नाही.

रेवणसिद्ध हे चिमडसंप्रदायाचे मूळ सिद्ध. त्यांचे शिष्य मरुळसिद्ध नावाचे होते. मरुळसिद्धांचे शिष्य काडसिद्ध या नावाचे होते. काडसिद्धांनी गुरुलिंगजंगमांना उपदेश देऊन जगदोद्धाराची आज्ञा केली. गुरुलिंगजंगमांच्या अनेक शिष्यांमध्ये रघुनाथप्रिय साधुमहाराज हे पट्टशिष्य होते. चिमडमहाराज हे रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे मुख्य शिष्य होते. या चिमडमहाराजांनी तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना बोध केला. तात्यासाहेब कोटणीसांचे शिष्य दासराममहाराज होत. गोविंद म्हणजे श्रीदासरामांचे पिताजी मामामहाराज केळकर हे होत. ते तात्यासाहेबमहाराजांना मनोभावे गुरु मानीत.

चिमड संप्रदायातील संतांचेकडून आलेला हा बोध हा सांप्रदायबोध या नावाने श्रीदासराममहाराजांनी अभंगबद्ध केला होता. तो स्वतंत्रपणे प्रकाशित झाला. श्रीदासराममहाराजांचे एक भक्त श्री. मुकुंदराव शं. सहस्रबुद्धे यांनी हा सांप्रदायबोध गुरुवार दि.१२.०७.१९८४, गुरुपौर्णिमा, या दिवशी प्रकाशित केला. तो श्रीदासरामगाथा या ग्रंथातही समाविष्ट झालेला आहे.

या सांप्रदायबोधाचे विवरण करावे अशी प्रेरणा मला इ.स. २०१२ च्या श्रावण महिन्यात झाली आणि त्याप्रमाणे हे विवरण त्याच महिन्यात रोज एक अभंग याप्रमाणे दिनांक १६.८.२०१२ रोजी पूर्ण झाले. सर्व अभंगांतील प्रत्येक चरणाचा अर्थ/भावार्थ विवरणात येत असल्यामुळे प्रत्येक अभंगचरणाचा अर्थ स्वतंत्ररूपाने दिलेला नाही. तसेच अभंगातील चरणांच्या अनुक्रमाने विवरण आहे, असेही नाही. तर त्या त्या अभंगातील विषय संगति लक्षात घेऊन विवरणाचे काम झाले आहे. या विवरणात काही त्रुटी अथवा उणीवा आढळलयास तज्ज्ञांनी क्षमा करावी अशी विनंती आहे.

प्रा. डॉ. के. वा. आपटे

# मनोगत

भगवान शंकरांपासून उद्भूत झालेला 'चिमड संप्रदाय' हा विशेषतः उत्तर कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रातील महत्त्वाचा संप्रदाय आहे. या संप्रदायात अनेक संतमहंत होऊन गेले व अजूनही विद्यमान आहेत. भगवान श्रीनिंबरगीकरमहाराज हे संप्रदायाचे उद्गाते. भ.स. श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर तथा श्रीचिमडमहाराज हे चिमड या गावी मठ स्थापून राहिले. म्हणून या संप्रदायाला 'चिमड संप्रदाय' असे नाव प्राप्त झाले.

या संप्रदायातील अर्वाचीन काळातील थोर संत म्हणजेच सांगली येथील भ.स. श्रीरामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज. भ.स. श्रीदासराममहाराज हे बालपणापासून कीर्तन करत; इतकेच नव्हे तर त्यांना 'आत्मयाची काव्यस्फूर्ती' होती. बालवयापासूनच त्यांनी लेखन सुरू केले. त्यांच्या वाङ्मयाचा विस्तार इतका आहे की, अजूनही ते प्रकाशात आणण्याचे काम सुरू आहे.

त्यांची एकदा चिमड संप्रदायातील संतांना आपल्याला बोध करण्याची विनवणी केली. त्यानुसार चिमड संप्रदायातील संतांनी त्यांना बोध केला. तो त्यांनी १३ अभंगांत काव्यबद्ध केला. हे अभंग 'श्रीदासराम गाथ्यात' प्रसिद्ध झाले आहेत. तसेच 'सांप्रदायबोध' हा स्वतंत्र ग्रंथही प्रकाशित झाला आहे.

या 'सांप्रदायबोधा'वर विवरण लिहिण्याची स्फूर्ती माझे पिताश्री प्रा.डॉ. के. वा. आपटे यांना इ.स.२०१२ मध्ये झाली. त्यानुसार त्यांनी विवरण व ग्रंथासाठी प्रस्तावनाही लिहून ठेवली. हाही ग्रंथ त्यांच्या हयातीत प्रसिद्ध होऊ शकला नाही, ही खंत माझ्या मनात आहे.

भ. स. श्रीदासराममहाराजांच्या आशीर्वादानेच त्यांच्या 'सांप्रदायबोधा'वरील विवरण प्रकाशित होत आहे. या कामी माझा मित्र श्री. दीपक चंद्रशेखर केळकर याचा पुढाकार आहे. भ.स. श्रीअण्णांनीही आशीर्वादपर चार शब्द लिहून दिले, याबद्दल त्यांना धन्यवाद. माझ्या मातोश्री श्रीमती माया केशव आपटे व माझी पत्नी सौ. पद्मावती यांचेही या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामी सहकार्य लाभले. त्याचेही आभार. अक्षर जुळणीचे अवघड काम वेळेत पूर्ण केल्याबद्दल श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांना तसेच मुद्रणाचे काम केल्याबद्दल एस.बी. लिथो प्रेसचे श्री. अमोल कुलकर्णी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांनाही धन्यवाद. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतल्याबद्दल श्री. महेश नामदेव शिंगारे यांचेही आभार. मुखपृष्ठकार श्री. सागर मोहिते यांनाही धन्यवाद.

चिमड संप्रदायातील सर्व संतसज्जनांच्या चरणी साष्टांग दंडवत करून माझे मनोगत येथेच पूर्ण करतो.

नारायण केशव आपटे
सोमवार दि.०८.०६.२०२०
ज्येष्ठ व.३/संकष्टी ४, शके १९४२

## ।। श्रीराम ।।

इ.स. १९८४ साली माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांच्या मनात चिमड संप्रदायातील संतांचा बोध प्रगट झाला. तो त्यांनी १३ अभंगात निबद्ध केला व या अभंग समूहाला (चिमड) संप्रदाय बोध असे नामाभिधान दिले. बोध ही करण्याची गोष्ट नसून घेण्याची गोष्ट आहे. जो बोध झाला असताना ''साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला'' असून नसल्यासारखी त्या महात्म्याची अवस्था होते.

प.पू.श्रीरामदास स्वामी म्हणतात, 'भक्ताचेनि साभिमाने । कृपा केली दाशरथीने । समर्थ कृपेची वचने । तो हा दासबोध ।।' तोच हा आहे आणि हाच खरा बोध आहे. यालाच सोहं बोध म्हणतात. हा सांप्रदाय बोध श्रीदादांचे कृपांकित श्री. मुकुंदराव सहस्रबुद्धे यांनी १२.०७.१९८४ रोजी प्रकाशित केला. या सांप्रदाय बोधाचे विवरण करावे अशी श्रीदादांच्या अंतरंगातील व कृपांकित असलेले, भक्ती आणि ज्ञान यांचा संगम असलेले प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या मनात अशी प्रेरणा झाली. त्याप्रमाणे त्यांनी हा विवरण केलेला ग्रंथ आज ''सांप्रदाय बोध'' या नावाने प्रकाशित होत आहे. अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. आम्हाला खरा बोध केव्हा होईल ''बोधी बोधले बोधिता नये ऐसे झाले । बापरखुमादेवीवरे विठ्ठले माझे मीपण हरविले ।।'' असे केव्हा होईल. मन हे राम झाले आता । मन हे राम झाले । असे झाले तरच. तसे ते घडावे अशी श्रीदादांचे चरणी प्रार्थना करतो.

ती.प.पू. श्रीदादांचे सगळे वाङ्‌मय प्रकाशित व्हावे असे अंतःकरणापासून ती. केशवकाकांना वाटत होते. तसे त्यांनी आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत केले. या त्यांच्या श्रद्धेला शतशः प्रणाम करतो.

''जववरी अर्जुना । तो भेटेना मना । तवचि या साधना । भजावे लागे ।।'' (श्रीज्ञानेश्वरमहाराज) तोच हा आहे, हाच तो बोध (सोहं बोध) आमच्या मनाला भेटेपर्यंत आमच्या हातून साधन झाले पाहिजे, अशी प्रार्थना श्रीसद्गुरु चिमडचे महाराज यांचे शब्दात करून येथेच थांबतो.

''अचूक साधन साधो या गुरूकुळा । तुझिया सकळा दासदासा ।।''

सदरचा हा ग्रंथ श्री. महेश नामदेव शिंगारे यांनी प्रकाशित केला असून मुद्रणाचे काम मे.एस. बी. लिथो प्रेस यांनी केले आहे. अक्षर जुळणी श्री.भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी केली असून, कच्ची मुद्रिते तपासण्याचे काम श्री. नारायण केशव आपटे यांनी केले आहे. सर्वांच्याच श्रद्धेला अनेक प्रणिपात.

शेवटी भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी अनेक प्रणिपात!

शेष श्रीरामस्मरण!

सांगली

दि.२२.०६.२०२०

श्रीदादांचा कृपाभिलाषी

चंद्रशेखर

(चंद्रशेखर रामराय केळकर)

# प्रकाशकाचे मनोगत

भगवान श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांच्या श्रीदासरामगाथ्यातील सांप्रदायबोध या शीर्षकाखाली असणाऱ्या १३ अभंगांचे विवरण असणारा **'सांप्रदायबोध'** हा ग्रंथ प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या अभंगांचे विवरण श्रीदासराममहाराज केळकर यांच्या अंतरंगातील शिष्य प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी केले आहे. हा ग्रंथ प्रकाशित होतेवेळी प्रा.डॉ. के.वा.आपटे हे सगुणरुपात नाहीत याचे वाईट वाटते. ते आत्ता असते तर त्यांना फार आनंद झाला असता. शेवटी महाराजांची इच्छा.

मी श्रीरामनिकेतनमध्ये इ.स.१९९५ पासून येत आहे. मी श्रीरामनिकेतनमधे येण्याला श्री. सुधाकर रेगोडकर हे कारणीभूत आहेत. त्यांनी मला प.पू. श्रीदादांचे रोज दर्शन घेत जा असे सांगितले होते. त्याप्रमाणे मी येऊ लागलो. इ.स.१९९८ साली मी महानगरपालिकेच्या निवडणुकीला उभारणार होतो. त्यावेळी माझे मित्र श्री. मिलिंद खाडिलकर हे रोज श्रीदादांकडे येत असल्याने त्यांनी मला अर्ज भरणेपूर्वी श्रीदादांचे दर्शन घेऊन अर्ज भरूया असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही श्रीदादांकडे आलो. त्यावेळी श्रीदादांनी मला संपूर्णपणे न्याहाळले व प्रसाद दिला व अर्ज भरणेपूर्वी भीमरूपी स्तोत्र म्हणून अर्ज भर, तुझे काम होईल असा मला आशीर्वाद दिला. या आशीर्वादामुळेच मी निवडणुकीत विजयी झालो. यामुळे माझी श्रीदादांच्यप्रती निष्ठा दृढ झाली. इ.स.२००६ पासून मी श्रीरामनिकेतनमध्ये सकाळच्या नित्यक्रमाला न चुकता येत आहे. माझ्यावर श्रीअण्णांचेही तितकेच प्रेम व जिव्हाळा आहे.

श्रीदादांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त श्रीदादांची ग्रंथ संपदा प्रकाशित करणेचे काम सुरु असलेचे मला समजले. माझ्या हातूनही काही

सेवा घडावी अशी माझी इच्छा मी श्री. दीपक केळकर यांचेकडे व्यक्त केली. त्यानुसार या ग्रंथाची प्रकाशन सेवा करणेची संधी मला मिळाली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

अशा या ग्रंथातील सांगितलेले श्रीदादांचे तत्त्वज्ञान व विचार मला व सर्व साधकांना नेहमीच मार्गदर्शक ठरतील अशी माझी खात्री आहे. शेवटी प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व प.पू.सद्गुरू श्रीअण्णामहाराज केळकर यांचे चरणी अनेक प्रणिपात करून येथेच थांबतो.

महेश नामदेव शिंगारे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक ... ... ... ... | एक |
| | आशीर्वाद ... ... ... ... | चार |
| | मनोगत ... ... ... ... | पाच |
| | प्रकाशकाचे मनोगत ... ... ... | सात |
| | **सांप्रदायबोध** | |
| १. | प्राणाचीया फेरी चाले जया द्वारी ... | १ |
| २. | जयाचेनी ज्ञान जयाचेनी भान ... ... | ४ |
| ३. | पंच महाभूती खेळते चैतन्य ... ... | ७ |
| ४. | अस्ति गुणधर्मे होतसे जाणीव ... ... | १० |
| ५. | ऐसा कोण विधी जयाने ही सिद्धी ... | १३ |
| ६. | जेणे या विश्वाचा होत असे बोध ... | १७ |
| ७. | संगतीसी आले म्हणोनी आपुले... ... | २० |
| ८. | सदा नामजप करी तरी कोण ... ... | २३ |
| ९. | तीर्थां जावोनिया आठवले ब्रह्म... ... | २७ |
| १०. | पंचभूतांची तो झाली झडपण ... ... | ३० |
| ११. | दुजेमाजी भ्रांती ते काय वसती... ... | ३३ |
| १२. | कल्पना सरता होय निर्विकल्प ... ... | ३७ |
| १३. | एकांती लोकांती देहांतीही नाम ... | ४० |
| | आरत्या ... ... ... ... | |
| | पुष्पसूची ... ... ... ... | |

## १.

**प्राणाचीया फेरी चाले जयाद्वारी ।**
**वास करी हरी तयावरी ।।१।।**
**आकाशात आत्मा ऐसी बोले श्रुती ।**
**तयाची प्रचीती कैसी घ्यावी ।।२।।**
**प्राणाचा हा खेळ आकाशाचे स्थानी ।**
**संगती वचनी संतांचीये ।।३।।**
**देऊळाभोवती घिरट्या घालोनी ।**
**मेळवीला कोणी हरी सांगा ।।४।।**
**प्राणाच्या संसारी घेता हरी नाम ।**
**होतसे विश्राम *दासरामा* ।।५।।**

समजा आपणास शंकराच्या देवळातील शंकराचे दर्शन घ्यावयाचे आहे. आता जर आपण नुसतेच देवळात न शिरता त्या देवळाभोवती घिरट्या घालत बसलो तर आपणास शंकराचे / देवाचे दर्शन कसे होणार? होणार नाही हे अगदी स्पष्ट आहे. देवळाच्या प्रवेशद्वारातून आत शिरून गाभाऱ्यापर्यंत आपण गेलो तर आपणास देवाचे दर्शन होईल, हे अगदी उघड आहे. याप्रमाणे आपणास आपल्या देहातील आत्म्याचे दर्शन घ्यावयाचे असल्यास, बाह्य जगातील पदार्थ, आपले शरीर, शरीराचे भाग यांतच जर आपण गुंतून राहिलो तर आत्म्याचे दर्शन कसे होणार? म्हणून शरीरात जेथे आत्म्याचा मुख्य वास आहे तेथे आपणास जाणे आवश्यक आहे.

आता प्रश्न असा :- शरीरात आत्मा कोठे आहे? श्रुतीने/वेदांनी सांगितले आहे की शरीरातील आकाशात आत्मा आहे (दिव्ये ब्रह्मपुरे ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः । मुंडक उपनिषद् २.७). ब्रह्मपुरात म्हणजे मानवी देहात जे आकाश आहे त्यात हा आत्मा आहे. गुलाबरावमहाराजही सांगतात की ''आकाशात आत्मा'' आहे मग प्रश्न असा :- शरीरातील ज्या आकाशात आत्मा आहे, ते आकाश कोणते ? याचे उत्तर असे आहे :- मानवाच्या शरीरामध्ये मस्तकामध्ये सहस्रदल नावाचे स्थान आहे, तेथे, ''कान, नाक, तोंड, डोळे व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेले आकाश आहे.'' (वचन संग्रह पृ.१६९). या आकाशाला अंतराकाश अथवा हृदयाकाश म्हणतात (वचन संग्रह पृ.१६९). या आकाशात आत्म्याचे स्थान आहे. हा आत्मा सच्चिदानंद वायुस्वरूप आहे. त्याचे दर्शन घ्यावयाचे आहे. त्या चिद्रूप वायुस्वरूप आत्म्याचे दर्शन घेण्याचा उपायही वायुरूप आहे. हा वायु म्हणजे प्राण आहे.

ज्या प्राणवायूच्या साहाय्याने वायुरूप आत्म्याचे दर्शन घ्यावयाचे आहे, तो वायु म्हणजे बाह्य जगातील प्राणवायु नव्हे हे अगदी उघड आहे. सहस्रदळ स्थानात जो प्राणवायु आहे तो आत्मदर्शनासाठी उपयोगी पडणारा आहे, असे संतांनी सांगितले आहे. म्हणून साक्षात्कारी संतांचेकडूनच या प्राणाच्या साधनाची माहिती घेणे आवश्यक आहे.

संत सांगतात :- ''जवाला आपल्याकडे नेण्यास परमात्मा हा प्राणरूपी दूताला भ्रुकुटीमध्यापर्यंत पाठवीत असतो. जीव जर भ्रूमध्यात गेला तर प्राण हा त्याला परमात्म्याकडे घेऊन जातो'' (वचन संग्रह पृ.१३९). म्हणजे असे :- ज्या सहस्रदळ स्थानात आत्मा/ परमात्मा आहे, तेथून चैतन्यरूप प्राणाची गती ही मानवी शरीरातील भ्रूमध्य या स्थानापर्यंत येत

असते. या प्राणवायुशी जर जीवाच्या चैतन्यरूप जीवनाचे मीलन झाले तर हा प्राण जीवाला सहस्रदळ स्थानात नेतो व जीवाला आत्म्याचे दर्शन होते. सहस्रदळस्थानात हरि/आत्मा आहे. त्याच्याशी जीव एकरूप होतो. आत्म्याशी एकरूप होणे म्हणजेच आत्म्याचे दर्शन होय.

चिद्रूप प्राणाच्या आधारावर माणसाचा श्वासोच्छ्वास चालू असतो. जीवाचे चैतन्यरूप ''जीवन हे श्वासोच्छ्वात आहे'' (वचन संग्रह पृ.२३६). या श्वासोच्छ्वासात हरीचे नाम म्हणजे चैतन्याचा नाद उमटत असतो. (पहा : नाम श्वासोच्छ्वासी असे । रामदासस्वामी). या श्वासोच्छ्वासाच्या गतीनेच हरिनामाची / रामनामाची गती आहे. या नामाच्या गतीशी मन जर एकरूप झाले तर, शुद्ध झालेले जीवाचे चैतन्यरूप जीवन ऊर्ध्वमुख होऊन, भ्रूमध्यात येते. आणि ते तेथे येणाऱ्या प्राणगतीशी एकरूप होते. मग हा प्राणवायु सहस्रदळात परत जातो आणि त्यातील माणसाचे चैतन्यरूप जीवन आत्म्याशी एकरूप होते. आत्म्याशी/हरीशी एकरूप होणे हेच हरीचे/आत्म्याचे दर्शन आहे.

अशाप्रकारे जीवाला आत्म्याचे दर्शन झाले की त्याला व्यावहारिक जीवनातील सुख-दुःखाचा विसर पडतो. त्याला आत्मानंद प्राप्त होतो. त्याला विश्रांती मिळते. असा आत्मानंद प्राप्त झाल्याने आपल्याला विश्राम मिळाला असे दासराममहाराज सांगतात.

***

**२.**

**जयाचेनी ज्ञान जयाचेनी भान ।**
**ऐसा तो चिद्घन आत्माराम ।।१।।**
**नामाचे साधनी प्रगटची होता ।**
**मार्गची पुढता दिसो लागे ।।२।।**
**चारी वाचेलागी कैसा स्फुरवीत ।**
**आणि विराजत षडचक्री ।।३।।**
**जीव शिव ऐसे उठती तरंग ।**
**सिंधु तो अथांग *दासरामी* ।।४।।**

आत्मदर्शन / आत्मसाक्षात्कार हा मानवी जीवनाचे साध्य आहे. हा आत्मा मानवी शरीरात आहे तसाच तो शरीराबाहेरही आहे. किंबहुना तो आत्मा सर्वव्यापक आहे. आत्मा हा पिंड (मानवी शरीर) आणि ब्रह्मांड व्यापून आहे. त्याचे थोडेसे वर्णन येथे केले आहे.

आत्मा हा आकाशाप्रमाणे सर्वव्यापक आहे. तो समुद्राप्रमाणे अफाट व अथांग आहे असे येथे म्हटले आहे. पौराणिक कल्पनेप्रमाणे प्रलयकाळी सर्व जलमय होऊन जाते. त्या प्रलयकालीन सागराप्रमाणे आत्मा हा अथांग आहे. त्याचा थांग लागत नाही. कारण मनाच्या कल्पनाशक्तीपलीकडे आत्म्याचे स्वरूप आहे. आत्म्याला आदि आणि अंत नाहीत.

सागरात अनेक तरंग/लाटा उठतात, त्या वाऱ्याच्या प्रतापामुळे. त्याचप्रमाणे उपाधीच्या संसर्गाने आत्मारूपी सागरात जीव आणि शिव हे तरंग उठतात. ब्रह्मांडाच्या उपाधीमुळे आत्मा हा शिवरूपात भासतो तर पिंडाच्या उपाधीमुळे आत्मा हा जीवरूपाने भासतो. वारा स्थिर होताच सागरात तरंग येत नाहीत. त्याच प्रमाणे पिंड आणि ब्रह्मांड या उपाधि दूर झाल्या की जीव आणि शिव हे आत्म्याचे स्वरूप अदृश्य होते. जीव, शिव, आत्मा हे एकरूप होऊन जातात.

मानवी शरीरात चैतन्यवायुरूप आत्मा आहे. हा ''चैतन्याचा वायु हा शरीरात संचार करीत असतो. चैतन्याचा वारा ज्या ज्या ठिकाणी संचार करतो, त्या त्या स्थानांना चक्र अशी संज्ञा दिली गेली आहे'' (वचन संग्रह पृ.२४१). या चक्रस्थानी वायुरूप आत्म्याचे काही वैशिष्ट्य आढळते. मानवी शरीरात सहा चक्रे आहेत असे सांगितले जाते. ही चक्रे पुढीलप्रमाणे दिली जातात ः- मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञा (मूलाधारं स्वाधिष्ठानं मणिपूरं तृतीयकम् । अनाहतं विशुद्धं च आज्ञाचक्रं च षष्ठकम्।। योगकुंडली उपनिषद् ३.९-१०)

मानवी शरीरात चार वाचा आहेत असे म्हटले जाते. त्या अशा ः- परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी. बेंबीपाशी वायूचे स्फुरण ही परा वाचा. हृदयातील वायूचे स्फुरण ही पश्यंती वाचा. कंठात होणारे वायूचे स्फुरण ही मध्यमा वाचा आणि मुखावाटे अक्षररुपाने वायु बाहेर पडणे ही वैखरी वाचा. या चारही वाचांना स्फुरण देणारा आत्मा आहे. जोपर्यंत चिद्वायुरुप आत्मा शरीरात आहे, तोपर्यंतच या वाचा आपले कार्य करतात. महणून आत्मा त्यांना स्फुरवितो असे येथे म्हटले आहे. या वाचांना आत्म्याचे ज्ञान होत नाही. म्हणून आत्मा हा वाचातीत आहे - निःशब्द आहे - असे म्हटले जाते.

माणसाचे शरीरात डोळे, कान, नाक, त्वचा आणि जिव्हा अशी पाच ज्ञानेंद्रिये आहेत. या पाच ज्ञानेंद्रियांच्या मार्फत माणसाला बाह्य जगातील शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच विषयांचे ज्ञान होत असते. चिदात्मा शरीरात आहे, तोपर्यंत ही इंद्रिये आपली कार्ये करतात. तसेच आत्म्याच्या अस्तित्वामुळेच अंतःकरणाचे द्वारा माणसाला भावना, विचार इत्यादींचे भान होत असते. आत्मारहित प्रेताला ज्ञानही होत नाही आणि त्याला भानही असत नाही. म्हणून आत्म्यामुळे ज्ञान आणि भान होते असे येथे म्हटले आहे. तसे पाहू लागल्यास ज्ञान आणि भान हे समानार्थी आहेत.

आत्मा हा चिद्रूप आहे. त्याला आत आणि बाहेर असे काही नाही. म्हणून तो चिद्घन - चैतन्याचा ठोकळा. आहे असे येथे सांगितले आहे. चैतन्याशिवाय आत्यात अन्य काही नाही. घरात अनेक वस्तु असतात. आत्म्यात चैजतन्याखेरीज अन्य काही नसल्याने तो चिद्घन आहे.

सांप्रदायबोधाचा पहिल्या अभंगात म्हटल्याप्रमाणे, श्वासोच्छ्वासातील नामाच्या साधनाने आत्मा प्रगट होत असतो आणि नाद व प्रकाश या स्वरूपात आत्म्याचे विविध प्रकारचे दर्शन साधकाला येत असते. नामाच्या गतीत मनाचा संपूर्ण लय झाला की उन्मनी/अमनी अवस्था प्राप्त होते. आणि या उन्मनी अवस्थेतच जीवचैतन्य हे आत्मचैतन्याशी एकरूप होऊन जाते. हाच जीवाला होणारा आत्मसाक्षात्कार होय.

***

## ३.

**पंच महाभूती खेळते चैतन्य ।**
**तेणेची चलन पंचभूता ।।१।।**
**साधू संत हेचि जाणती वर्म ।**
**जेणे कर्म धर्म सुफल होय ।।२।।**
**मनालागी असे विषयांची गोडी ।**
**म्हणोनी ते गोडी कल्पनेची ।।३।।**
***दासराम* ध्याई रामकृष्णहरी ।**
**तया कृपा करी हनुमंत ।।४।।**

चिद्रूप आत्मा सर्वव्यापक आहे. आत्म्यापासून हे विश्व निर्माण झाले. विश्व म्हणजे पाच महाभूतांचे परस्परमिश्रण आहे. आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी अशी ही पाच महाभूते आहेत. या भूतांमध्येसुद्धा आत्मरूपी चैतन्य उपस्थित आहे. या संदर्भात रामदासस्वामी आपल्या दासबोध ग्रंथात सांगतात, ''म्हणौनि जाणीव नेणीव मिश्रित । अवघे चालिले पंचभूत । म्हणौनिया भूतांत । जाणीव असे ।।९.६.२०।।, कोठे दिसे कोठे न दिसे । परी ते भूती व्यापून असे। तीक्ष्ण बुद्धि करिता भासे । स्थूळ सूक्ष्म ।।९.६.२१।।''. चैतन्यामुळे जाणीव असते. म्हणून चैतन्य सर्वत्र आहे. चैतन्य हे स्पंदरूप आहे असे श्रीदासराममहाराज अन्यत्र सांगतात (वचन संग्रह, पृ.७८, २१५). हा स्पंद पाचही महाभूतांमध्ये आहे. म्हणजे पाचही महाभूतांत चैतन्य आहे. आपणास ते जाणवत नसले तरी

ते आहे यात शंका नाही आणि हे चैतन्य असल्यानेच, त्याच्या अधिष्ठानावर पंचभूतांचे चलनवलन चालते. त्यांचे चलनवलन म्हणजे त्यांचे कार्य. याच महाभूतांची कार्ये अशी आहेत :- आकाश हे सर्वांना अवकाश/जागा देते. वायु इकडे तिकडे फिरत असतो. तेज/अग्नि हा ज्वलनाचे आणि उष्णता देण्याचे कार्य करतो. पाणी हे खोलगट भागाकडे वहात असते. ते प्राण्यांची तहान भागवते. शीतत्व या गुणाने शीत करण्याचे कार्य पाणी करते. पृथ्वी ही तर सर्व भूतमात्रांना आधार/आश्रय देण्याचे कार्य करते. तसेच पृथ्वीतून बाहेर येणारे वृक्ष, वेली, पिके ही प्राणिमात्रांना उपयोगी पडतात. भूकंप इत्यादीद्वारा पृथ्वी आपले कर्तृत्व दाखवत असते. पाच महाभूतांची ही कार्ये चैतन्याच्या अधिष्ठानावरच चालतात.

मानवी जीवनातही आत्मा अधिष्ठानभूत असतो. प्रत्येक जड शरीरात आत्मा हा अंतरात्मा/प्रत्यगात्मा या स्वरूपात असतो आणि तो देह, इंद्रिये यांचे चलनवलन करवून घेतो. मानवी शरीरातील केवळ चार वाचाच आत्म्यामुळे कार्य करतात असे नसून सर्व ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांना प्रेरणा देणारा आत्मा आहे. हात, पाय, गुद, शिश्न, वाणी अशी पाच कर्मेंद्रिये आहेत. तसेच अंतःकरण आहे. यांच्याद्वारे होणारी कार्ये ही कायिक, वाचिक आणि मानसिक असतात. धर्म शब्दाने माणसाचे कर्तव्य अभिप्रेत आहेत. चार वर्ण- ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र - आणि चार आश्रम - ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास - यांची कर्तव्ये आहेत. तसेच धर्म म्हणजे सदाचार आहे. धर्म शब्दाने अधर्मही सूचित होतो. त्यामुळे कर्तव्याचा अभाव आणि दुराचार सूचित होतो. माणसाच्या बऱ्या वाईट कर्मांमुळे कर्मांची फळे भोगण्यास माणसाला पुनःपुनः जन्माला यावे लागते आणि मरावे लागते. हे सर्व आत्मचैतन्यामुळे घडते आणि हे वर्म साधुसंतांना माहीत असते. साधुसंत ते की, ज्यांनी आत्मसाक्षात्कार करून घेतला आहे.

पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये यांचे जोडीने माणसाला मन/अंतःकरण आहे ही इंद्रिये बहिर्मुख म्हणजे बाह्य विषयांकडे धावणारी अशीच ब्रह्मदेवाने निर्माण केली आहेत. इंद्रियांना होणाऱ्या विषयांच्या संवेदना मनापर्यंत पोचतात आणि मग मन हे इंद्रियद्वारा जगातील शब्द, स्पर्श, रूप, रंग, गंध अशा पाच विषयांकडे धावते. त्यांतील ज्या विषयातून सुख होते त्याची गोडी मनाला लागते. पण बाहेरील विषय हे सतत सुख देत नाहीत, म्हणून बाह्य विषय हे सुखकारक आहेत ही मनाची भावना कल्पनाच ठरते. ती काल्पनिक होते. मनाची विषयांबद्दलची ओढ/गोडी ही काल्पनिक, निरर्थक होते.

श्रीदासराममहाराजांचे गुरु हणमंत म्हणजे तात्यासाहेबमहराज कोटणीस हे होते. त्यांनी वयाच्या चौदाव्या दिवशी श्रीदासरामांवर अनुग्रह केला आणि त्यांच्या कृपेनेच दासरामांचे साधन पूर्णत्वाला जाऊन सिद्ध झाले. रामकृष्णहरी हा महामंत्र आहे. त्यातील शब्दांनी इडा, पिंगला व सुषुम्ना या नाड्या सूचित होतात. इडा नाडी माणसाच्या डाव्या नाकपुडीत असते तर पिंगला नाडी माणसाच्या उजव्या नाकपुडीत असते. इडा-पिंगला एक झाल्या की सुषुम्ना प्रगट होते. या श्वासोच्छ्वासाशी संबंधित आहेत. श्वासोच्छ्वासात नामाचा-चैतन्याचा-वास आहे. त्या नामाला कधी रामनाम, कृष्णनाम, हरिनाम असेही म्हटले जाते कोटणीसमहाराजांच्या कृपेने दासरामांचे मन या श्वासोच्छ्वासातील नामात लय पावले. रामकृष्णहरीचे ध्यान म्हणजे श्वासोच्छ्वासातील नामाचे अनुसंधान. हे अनुसंधान दासरामांना अखंडत्वाने साध्य झाले आणि या ‘सिद्धसाधनाने’ दासराम हे ‘स्वये ब्रह्म झाले’.

***

## ४.

**अस्ति गुणधर्मे होतसे जाणीव ।**
**ज्ञानाची राणीव तेथे असे ।।१।।**
**भाती गुणे कैचा होत असे भास ।**
**प्रकाशे प्रकाश साकारले।।२।।**
**संयोगीच योग वियोगाने कळे ।**
**योगेचि आकळे भक्तीभाव ।।३।।**
**देही अनासक्त ऐसे हरी भक्त ।**
**थोर हेची मात संती केली ।।४।।**
***दासराम* त्यांचे वंदितो चरण ।**
**सदा कृपादान ज्यांनी केले ।।५।।**

आत्मा हा सत्-चित्-आनंद आहे. सत् शब्द अस्तित्व दाखवितो. चित् शब्द हा चैतन्य /ज्ञान दाखवितो. आनंद हा शब्द विषयरहित सतत असणारा आनंद दर्शवितो. या सच्चिदानंद शब्दाऐवजी कधी कधी अस्ति, भाति आणि प्रिय हे शब्द संतांनी वापरले आहेत. म्हणून आत्मा हा अस्ति, भाति आणि प्रिय आहे असे म्हटले जाते. या अभंगाच्या पहिल्या दोन चरणात अस्ति आणि भाति या शब्दांचा खुलासा केलेला आहे.

अस्तित्व हेच आत्मा आहे. अस्तित्व आहे हे कळण्यास तेथे चैतन्य/ज्ञान हवे. आत्म्याच्या ''अस्ति'' या गुणधर्माने जाणीव/ज्ञान सूचित

होते. म्हणून अस्तित्व हेच चैतन्यरूप आहे असे म्हटले जाते. चैतन्यामुळेच ज्ञान होत असते. अशाप्रकारे अस्तित्वात ज्ञान आहे असे म्हटले जाते.

भाति या शब्दाने चैतन्य सूचित होते. ''भाति'' याचा शब्दशः अर्थ आहे ''प्रकाशतो'', प्रकाश. अस्तित्व हे स्थिर असते. भाति शब्दाने सूचित होणारे चैतन्य हे चंचल असते. अस्तित्व हे निश्चळ असते तर चैतन्य चंचळ असते. या निश्चळाचे ठिकाणीच चांचल्य उद्भूत होते (निश्चळाच्या अंगावरी । उठती चंचळाच्या लहरी ।।). अस्तित्वरूप आत्मा हा चैतन्याचा चांचल्याने विश्वरूपात भासू लागतो. अर्थात् विश्व हे आत्म्यावरचा भास आहे. चैतन्य हे प्रकाशरूप आहे. या चैतन्याच्या प्रकाशाने विश्व हे प्रकाशरूपात दिसू लागले म्हणजे भासमान होऊ लागले.

या भासात्मक जगात देहाच्या उपाधीत सापडलेला आत्मा हा जीवरूपाने भासू लागला. पण या देहाच्या उपाधीमुळे तो मूळ आत्मस्वरूपापासून वियुक्त झाला, वेगळा झाला असे भासू लागले. अशा स्थितीत या जीवाची जर साक्षात्कारी सद्गुरूशी - संतांशी- गाठ पडली तर गुरु/संत सांगतो :- हे जीवा, खरे म्हणजे तूच आत्मा आहेस, पण उपाधीमुळे तुझा त्या आत्म्यापासून वियोग झाला आहे, त्याच्या आधारानेच तुला पुनः आत्म्याशी एकरूप/संयुक्त व्हावयाचे आहे. म्हणजे अज्ञान टाकून मीच आत्मा आहे, हे तू जाणून घ्यायचे आहेस. गुरूच्या उपदेशामुळे हे कळते.

आता आत्म्याशी संयुक्त/एकरूप होण्यासाठी जी प्रक्रिया आहे तिचा योग शब्दाने सुचवली आहे. या योगाने भक्तिभाव कळतो असे येथे म्हटले आहे. म्हणजे भक्तीचा योग साधून आत्म्याशी एकरूप व्हावयाचे आहे. येथे अभिप्रेत असणारी भक्ति ही नाम-स्मरण-भक्ति आहे. मानवी

देहातील श्वासोच्छ्वासात जे नाम - चैतन्याचा नाद - घुमत आहे, त्याच्याशी एकरूप (योग) होणे हे साधता येते. कारण चैतन्याचा नाद हेच चैतन्याचे रूप आहे, नाम तेच रूप आहे ( नाम तेचि रूप । रूप तेचि नाम ।).

जीव सध्या देहाच्या उपाधीत सापडला आहे. या देहापासून सुटून नामाच्या नादात एकरूप झाल्याशिवाय चैतन्यरूप आत्मा हस्तगत होत नाही. देहापासून सुटणे म्हणजे मरणे नव्हे तर देहभान विसरणे. झोपेत असे देहभान विसरले जाते हे सर्वांच्या परिचयाचे आहे. नामामध्ये आसक्त झाले की माणूस देहाच्या बाबतीत अनासक्त होतो. जे हरीचे म्हणजे आत्म्याचे भक्त आहेत, जे नामस्मरणात गुंगून गेले आहेत, नामात देहभान विसरले आहेत, ते साहजिकच देहाचे संदर्भात आसक्त असत नाहीत. म्हणजे सामान्य माणसाप्रमाणे 'देह म्हणजे मी' अशी त्यांची बुद्धि नसते. संत म्हणजे आत्म्याशी एकरूप झालेला जीव. तसे होण्यास त्यांनी देहाची जाणीव सोडून दिलेली असते, त्यांना देहाचे भान असत नाही. सर्व संतांनी देहाकडे दुर्लक्ष करून, देहाचे भान विसरून, चैतन्यरूप नामाकडे लक्ष दिले, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट संतांनी केली.

अशा संतांनी दासराममहाराजांचेवर कृपा केली. हे संत म्हणजे दासराममहाराजांचे गुरु कोटणीसमहाराज. तसेच दासरामांच्या चिमड संप्रदायाचे प्रेरक श्रीनिंबरगीकरमहाराज, त्यांनी दासरामांचेवर कृपा केली. त्यांच्या कृपेने दासराम आत्म्याशी एकरूप झाले. असा सद्गुरूंचा उपकार दासरामांवर झाला, म्हणून दासराम अशा सद्गुरु संतांचे चरणांना वंदन करतात.

***

**५.**

**ऐसा कोण विधी जयाने ही सिद्धी ।**
**होतसे समृद्धी जीवनाची ।।१।।**
**रिद्धी सिद्धी संती दूरची ठेविली ।**
**एकांती साधिली जीवनकळा।।२।।**
**साक्षात्काराहोनी थोर चमत्कार ।**
**मानीती साचार जनलोक ।।३।।**
**साक्षात्कारे जाला विश्व चमत्कार ।**
**चमत्कारी भर चमत्कृती ।।४।।**
**चमत्कार करी तोचि जगी थोर ।**
**वाटे चमत्कार हाचि संता ।।५।।**
**विश्वासी प्रेरणा काय असे शक्ती ।**
***दासराम* महती थोर तेची ।।६।।**

आत्म्याचा साक्षात्कार जीवाने करून घेणे, हे मानवी जीवनाचे ध्येय आहे, असे साधुसंत सांगतात. ज्याला आत्मसाक्षात्कार होतो, तोच खरा संत होय. असा संत हा आपल्या आत्मानंदात निमग्न असतो. अशा संतांचे द्वारा ईश्वर कधी कधी चमत्कार घडवून आणतो. चमत्कार म्हणजे ज्याचे तार्किकदृष्ट्या काही योग्य स्पष्टीकरण देता येत नाही अशी घटना. उदा.मेलेल्याला जिवंत करणे. ज्ञानेश्वरमहाराजांनी मेलेल्या सच्चिदानंद बाबाला पुनः जिवंत केले.

साक्षात्कार आणि चमत्कार याकडे पाहण्याची सामान्य माणसाची दृष्टि/वृत्ती वेगळी असते. साक्षात्काराचे स्वरूप सामान्यांना माहीत नसते. चमत्कार म्हणजे काहीतरी अद्भुत गोष्ट असे लोकांना वाटते. साक्षात्कार हा सामान्य लोकांना अदृश्य असतो, तर चमत्कार हा दृश्य असतो. त्यामुळे सर्वसामान्यपणे लोक साक्षात्कारापेक्षा चमत्कार श्रेष्ठ आहे असे समजतात आणि जो चमत्कार करतो तो संत असे लोकांना वाटते. पण संतांची दृष्टी वेगळी असते. साक्षात्कारापेक्षा चमत्कार श्रेष्ठ आहे असे जे सामान्य लोकांना वाटते तोच चमत्कार आहे असे संतांना वाटते. येथे चमत्कार शब्दाने काही तरी वेगळी गोष्ट असे सुचवावयाचे आहे. कारण साक्षात्कार आणि चमत्कार यात तसा काही संबंध नाही.

तसे पाहू गेल्यास ज्या जगात/विश्वात माणूस वावरत आहे, ते विश्व हाच महान् चमत्कार आहे. म्हणजे असे :- खरे पहाता विश्व म्हणून स्वतंत्र असे काही नाही. आहे तो एक आत्मा आहे. आत्मा हेच सर्वव्यापक सत्य तत्त्व आहे. पण ते अज्ञानी माणसांना कळत नाही. आत्म्याच्या अज्ञानाने आत्म्यावरच विश्वाचा आभास होतो. जसे :- जमिनीवर पडलेली रज्जू अंधुक प्रकाशात साप म्हणून न कळल्याने तेथे सापाचा भास होतो. शुक्ति ही शुक्ति म्हणून न कळल्याने शुक्तीवर रजताचा भास होतो. म्हणजे जेथे जे नाही, ते दिसणे हा चमत्कार नव्हे का? आत्मा आहे; तेथे विश्व नाही. म्हणून ज्या आत्म्याचे ठिकाणी विश्व नाही, त्या आत्म्यावर विश्वाचा भास होणे, ही एक अद्भुत गोष्ट/चमत्कारच आहे. आता विश्व हा एक चमत्कार आहे आणि या विश्वरूपी चमत्कारात जे कोणी चमत्कार करतात त्यांनी केलेल्या चमत्कारांची भर पडत जाते आणि लोक त्या उत्तरोक्त चमत्कारांनी भारावून जातात, वाहून जातात.

आत्म्यावर विश्व भासते हा चमत्कार नाही असे कुणी म्हटले तर असे म्हणता येईल. सर्वशक्तिमान ईश्वराने हे विश्व निर्माण केले. आता हे अफाट विश्व निर्माण करण्याची शक्ती ज्याच्याजवळ आहे, तो परमेश्वर किती मोठा असला पाहिजे याची कल्पनाच करता येत नाही. परमेश्वराने अनंत ब्रह्मांडे निर्माण केली. हा चमत्कार आहे. एक साधी गोष्ट करताना माणूस टेकीला येतो. पण त्याला आपण मानतो. उदा. विमान निर्माण करणारा माणूस. अशा माणसापेक्षा ईश्वर कितीतरी पटीने मोठा आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ही ईश्वराची शक्ति आणि त्याचा महिमा हा दासराममहाराजांना पटला आहे.

चमत्कारापेक्षा आत्मसाक्षात्कार श्रेष्ठ असे म्हणतात, आता प्रश्न असा :- कोणत्या उपायाने ही आत्मसाक्षात्काराची सिद्धी प्राप्त करून घेता येते? आणि मग त्यामुळे मानवी जीवन समृद्ध होते, कृतार्थ होते, कृतकृत्य होते? याचे उत्तर आहे :- एकांतात बसून जीवनकला साधावयास हवी. हा उपाय करताना साधकाला रिद्धीसिद्धी प्राप्त होऊ शकतात. रिद्धी म्हणजे समृद्धी. ही समृद्धि पैशाची, धान्याची, पशूंची इत्यादि अनेक प्रकारची असू शकते. सिद्धि ही नानाप्रकारची आहे. अणिमा, लघिमा, गरिमा इत्यादि आठ सिद्धि मानल्या जातात. पण या रिद्धिसिद्धींच्या वापरात माणूस गुंतल्यावर त्याला आत्म्याचा साक्षात्कार होणार नाही. म्हणून संत सांगतात :- साधकाने या ऋद्धिसिद्धींना लाथाडून केवळ आत्म्याकडे लक्ष पुरवून आत्मसाक्षात्कार करून घ्यावयास हवा. संतांनी तसेच केले.

आत्मसाक्षात्कारासाठी मानवी जीवन हे साधन/उपाय आहे. श्वासोच्छ्वासात मानवी जीवन आहे. जोपर्यंत श्वासोच्छ्वास चालू आहे तोपर्यंतच माणसाचे जीवन असते. हे जीवन म्हणजे शरीरातील आत्मचैतन्य

आहे. गुरूंनी / संतांनी सांगितलतल्याप्रमाणे श्वासोच्छ्वातील चैतन्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. हे चैतन्य श्वासोच्छ्वासात नादरूपाने प्रत्ययाला येते. श्वासोच्छ्वासातील चैतन्याचा नाद म्हणजेच नाम आहे. जर श्वासोच्छ्वासातील नामाशी/चैतन्याच्या नादाशी मन एकरूप झाले की ते अमन/उन्मन होते आणि त्या उन्मनी अवस्थेतच आत्मचैतन्याचा साक्षात्कार होतो. आत्मा हा सच्चिदानंद आहे. नामाच्या साधनाने जीव सच्चिदानंदरूप आत्मा होऊन जातो. ''आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे''. श्वासोच्छ्वासरूपी आयुष्याचा/जीवनाचा उपयोग करून सच्चिदानंदस्वरूप आत्मा होणे हेच मानवी जीवनाचे सार्थक आहे. ते साध्य झाल्यावर जीवनात आणि काही मिळवावयाचे रहात नाही.

***

## ६.

**जेणे या विश्वाचा होत असे बोध ।**
**तयाचाची शोध संती केला।।१।।**
**शोधक तो कोण पाही विचारून ।**
**कोण तयावीण शोध करी ।।२।।**
**जयाने प्रचीती तयाची प्रचीती ।**
**हेचि भली चित्ती वाटतसे ।।३।।**
**प्रचीतीने घेता प्रचीतीचा ठाव ।**
**तेचि ते सदैव *दासरामी* ।।४।।**

माणसाला जगातील पदार्थांचे ज्ञान करवून देणारी जी इंद्रिये आहेत, त्यांना ज्ञानेंद्रिये म्हणतात. ही पाच ज्ञानेंद्रिये अशी :- डोळा, कान, नाक, त्वचा आणि जीभ. ही इंद्रिये जगातील शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच विषयांच्या संपर्कात आली की इंद्रियामार्फत संवेदना मनात येतात आणि मग मनाला त्या त्या विषयाचे ज्ञान होते. अशाप्रकारे इंद्रिये व मन ही ज्ञान होण्याची साधने आहेत आणि त्यांचेद्वारा माणसाला बाह्य विश्वाचे - जगाचे - ज्ञान (बोध) होत असते. केन उपनिषदाने म्हटल्याप्रमाणे, ज्याच्या साठी ही इंद्रिये ज्ञानाची साधने आहेत, तो अंतरात्मा आहे. जोपर्यंत शरीरात चैतन्यरूप अंतरात्मा आहे, तोवरच ही इंद्रिये आपापली कार्ये करीत असतात. शरीरातून आत्मा निघून गेल्यावर उरलेल्या प्रेतरूप शरीरात जरी ही इंद्रिये असली तरी तेथे बाह्य पदार्थांचे ज्ञान होत

नाही. नेहमीच्या व्यवहारात आपणास वाटत/कळत नाही की अंतरात्मा हा खरा ज्ञाता आहे. खरे असे आहे की, इंद्रियामार्फत ज्ञान करवून घेणारा अंतरात्मा आहे; पण त्याला इंद्रिये जाणू शकत नाहीत. हा जो ज्ञाता अंतरात्मा आहे, त्याचा शोध साधु-संतांनी केला.

पण अंतरात्म्याचा शोधक - शोध करणारा - कोण आहे याचा विचार करून पाहिले, तर असे आढळते की, हा शोध घेणारा अंतरात्माच आहे. कारण तो ज्ञानरूप आहे; बाकीचे शरीर, मन इत्यादि जड / अचेतन, ज्ञानरहित आहेत. म्हणून शोध करणारा तरी अंतरात्म्याशिवाय दुसरा कोण असणार? अंतरात्मा हाच स्वतःचा शोध घेतो आणि त्याला आढळून येते की आपणच ज्ञाता आहोत. देहातील इंद्रिये ही नुसती ज्ञानाची साधने / द्वारे आहेत. म्हणून ज्ञान करून घेणारा आणि त्या ज्ञात्याचा शोध करणारा अंतरात्माच आहे असे कळून येते. म्हणून ज्याच्यामुळे प्रचीती - ज्ञान - होते त्याचे ज्ञान/प्रचीती करून घेणे ही गोष्ट महत्वाची ठरते. म्हणून ज्याच्यामुळे बाह्य विषयाची प्रचीती येते, त्याचे ज्ञान/प्रचीती संतांनी करून घेतले आणि संतांच्या असे लक्षात आले की, बाह्य आणि आंतरविषयांचे ज्ञान करून घेणारा अंतरात्मा आहे; आणि या अंतरात्म्याचा शोध घेणाराही अंतरात्माच आहे. विषयांचा ज्ञाता आणि त्या ज्ञात्याचा शोध घेणारा (शोधक) एक अंतरात्माच आहे.

या अंतरात्म्याशिवाय ज्ञान करून घेणारा ज्ञाता - प्रचीति घेणारा - अन्य कुणी नाही आणि त्या ज्ञात्याचा शोध घेणारा (शोधक) अंतरात्म्याशिवाय अन्य कुणी नाही. म्हणून दासराममहाराज म्हणतातः- प्रचीतीने प्रचीतीचा ठाव घेतला असता, म्हणजे ज्ञान करून घेणारा कोण याचा शोध घेतला असता अंतरात्मा हाच ज्ञाता आहे आणि त्याचा शोध

घेणाराही तोच आहे हे मला कळले आणि तेच माझ्या मनात नेहमी बिंबून राहिलेले आहे.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास :- माणसाला इंद्रियद्वारे जे ज्ञान होते ते कुणाला होते हे नेहमीच्या व्यवहारात माणसाला कळत नाही. पण जर विचारपूर्वक शोध घेतला तर कळते की ज्ञानाचा ज्ञाता हा अंतरात्मा आहे आणि अंतरात्म्याशिवाय अन्य कुणीही शरीरात चेतन नसल्याने अंतरात्म्याचा शोध करणाराही अंतरात्माच आहे. अध्यात्म दृष्ट्या अंतरात्म्याचा शोध घेणे हे महत्त्वाचे आहे आणि असा शोध घेतल्यावर कळते की ज्ञाता आणि त्याचा शोध करणारा हा एक अंतरात्माच आहे. अंतरात्म्यामुळे मन हे कार्य करीत असते. हे मन मनाचा शोध घेऊ शकते. तद्वत अंतरात्म्याचे बाबतीतही आहे.

***

**७.**

**संगतीसी आले म्हणोनी आपुले ।**
**ऐसे कैसे भले वाटे जीवा ।।१।।**
**जेणे घडविली ऐसी हे संगती ।**
**तयाची संगती का न व्हावी ।।२।।**
**देहाचे संगती जे लागे संगती ।**
**त्याची विसंगती कोण करी ।।३।।**
**तया नाही ठाव ऐसा काय भाव ।**
**हा कोण उपाव सुखालागी ।।४।।**
**ऐशा संगतीची लागता संगती ।**
**तेचि ते संगती *दासरामी* ।।५।।**

या जगात जीवांचा/माणसाचा व्यवहार कसा चालतो याचे दिग्दर्शन करून, ज्याच्यामुळे हा व्यवहार चालतो त्या परमेश्वराची - आत्म्याची - संगती म्हणजे दर्शन आवश्यक आहे असे या अभंगात दासराममहाराज सांगतात.

माणसाला या जगात एक पाच महाभूतांपासून बनलेला स्थूल देह आहे. तो स्थूल देह आई-बापांच्यामुळे प्राप्त झाला. या आई-बापांना अनेक नातेवाईक आहेत. तसेच जन्मानंतर त्या मुलाला स्वतःचे असे अनेक नातेवाईक होतात. अशाप्रकारे आई, बाप, आजी, आजोबा, काका,

काकू, आत्या, मामा, मामी, मावशी, पुत्र, सून, नातू, पणतू इत्यादि नाती निर्माण होतात आणि या सर्वांबद्दल त्याला ओढ वाटू लागते. देहामुळे, देहाच्या संगतीने हे सर्व नातेवाईक आपले, असे जीवाला वाटू लागते, हे एक मोठे आश्चर्य आहे असे संतसज्जनांना वाटू लागते. याचे कारण असे :- देह हा नाशवंत आहे. देह नष्ट झाला, देहाची संगती सुटली की ही नातीही संपून जातात. देहाच्या संगतीमुळे जी नाती झाली होती ती देह नष्ट करून, नष्ट करणारा कोण आहे? नातेवाईकांची संगती बंद करण्याचे (विसंगती) करण्याचे काम कोण करतो? याचे उत्तर परमेश्वर असे आहे. प्राण्यांच्या भल्याबुऱ्या कर्मानुसार त्यांना देह देणारा, देहाअंती नाती निर्माण करणारा आणि देहपातानंतर नाती नष्ट करणारा परमेश्वर आहे. पण गंमत अशी की ही गोष्ट प्रायः माणसांना माहीत नसते. संगती आणि विसंगती करणारा ईश्वर आहे हे माहीत नसल्याने, सर्व नातेवाईक आपले आपले असे जीवाला वाटत रहाते. पण ईश्वर आपला आहे असे मात्र जीवाला वाटत नाही, हे आश्चर्य नव्हे का?

ज्या ईश्वराने देह निर्माण करून जीवाला नातेवाईकांची संगती दिली आणि जो देह नष्ट करून ही नाती संपवितो, त्या देवाची संगती मिळविण्याचा प्रयत्न माणसाने का करू नये? ज्या ईश्वरामुळे नातेवाईकांची संगती आणि विसंगती/वियोग घडतो, त्या ईश्वराचे संगतीत-सान्निध्यात - जाण्याची इच्छा जीवाने खरे म्हणजे करावयास हवी. पण व्यवहारात प्रायः तसे आढळत नाही. ईश्वर आहे का, तो सर्वकर्ता आहे का, अशाप्रकारच्या शंका माणूस काढीत बसतो. ईश्वर आहे हे मानण्यासही प्रायः कुणी तयार होत नाही, हे मोठे आश्चर्य आहे, असे दासरामांना वाटते.

ईश्वर हा सर्व जाणणारा आहे. त्याला ज्ञात नाही (ठाव) अशी कोणतीही गोष्ट (भाव) नाही. या ईश्वराचे दर्शन होऊन सुखी होणे हे

माणसाचे कर्तव्य आहे आणि तसे केल्यास त्याच्या जीवनाचे इतिकर्तव्य साधणार आहे. पण तसे न करता जीव बाह्य जगातील वस्तूत सुख शोधण्याचा प्रयत्न करतो. याचे आप्त, नातेवाईक माझे भले करतील, सुख देतील असे त्याला वाटते. पण हा त्याचा निव्वळ भ्रम आहे. याचे कारण असे :- जगातील विषय बदलणारे, नष्ट होणारे, सतत आपल्या जवळ न रहाणारे असे आहेत. तसेच एकच विषय सुख देत राहील असेही नाही. तसेच ''असतीत शिते तर जमतील भुते'' या म्हणीनुसार जोपर्यंत आपल्याजवळ द्रव्य इत्यादी आहे, तोपर्यंत नातेवाईक आपल्या भोवती गोळा होतील, आपल्याला भले म्हणतील, आपले बरे करण्याचा प्रयत्न करतील, आपल्याला सुख देण्याचा प्रयत्न करतील. पण द्रव्य इत्यादी संपून जाताच, ते नातेवाईक आपणास केव्हा सोडून गेले हेसुद्धा कळणार नाही. इतकेच नव्हे तर नंतर ते आपले अहित, आपला अपमान इत्यादि करून आपणास त्रास/दुःख देण्याचासुद्धा प्रयत्न करतील.

या जगात सुख मिळविण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे ईश्वराची संगती, ईश्वराची प्राप्ती. ईश्वर हा आनंदरूप/सुखरूप आहे. जीव जर योग्य तो उपाय अंमलात आणून ईश्वररूप होईल तरच तो कायमचा सुखी होईल.

म्हणून दासराममहाराज म्हणतात, ''ज्या ईश्वरामुळे व्यवहारात आपल्याला सग्यासोयऱ्यांची संगती लाभते, त्या संगती देणाऱ्या ईश्वराची संगती माणसाने करावयास हवी आणि अशी ईश्वराची संगती मी केली.''

या अभंगात 'संगती' शब्द अनेकदा वापरून दासरामांनी मौज केली आहे.

***

## ८.

**सदा नामजप करी तरी कोण ।**
**सांगा निवडोन मायबाप ।।१।।**
**तेथे जरी लक्ष कोण ठेवी सदा ।**
**मग तो का कदा जप करी ।।२।।**
**सदोदित जप हेची थोर तप ।**
**जेणे अनुताप विषयासी ।।३।।**
**जपी तपी ऐसे जगी जे का झाले ।**
**तयासी साधले आत्मरूप ।।४।।**
**आत्मरूपाकार स्वये साधुसंत ।**
**दावियली मात *दासरामी* ।।५।।**

भाविकजनांना उद्देशून या अभंगाच्या पहिल्या दोन चरणात प्रश्न केलेले आहेत. त्यांना आदर दाखविण्यासाठी ''मायबाप'' असे शब्द दासराममहाराज वापरतात. ते म्हणतात, ''हे मायबाप हो, या जगात सदा नामजप कोण करतो ते सांगा. मानवी देहात सदा समनामाचा जप चाललेला आहे. तेथे जर कुणी लक्ष ठेवीत असेल, तर तो कधी कधी जप करतो, असे म्हणता येईल काय?'' या दोन चरणात पुढील गोष्टी अभिप्रेत आहेत. :- ईश्वराच्या प्राप्तीसाठी काही लोक जप-तप करतात. कधी ते जप करताना दिसतात तर ते कधी जप करताना दिसत नाहीत. पण काही गुरुपुत्र असे असतात की ते गुरूने सांगितल्याप्रमाणे जप करीत असतात. ते मात्र कधी

जप करतात आणि कधी करीत नाहीत असे मात्र म्हणता येत नाही. याचे कारण असे :- सर्व संतांनी असे सांगितले आहे की, ईश्वराच्या नामस्मरणाने/ नामजपाने ईश्वराची प्राप्ती होते. त्यांनी असेही सांगून ठेवले आहे की, मानवी देहात २४ तास रामनाम चालू आहे. त्या रामनामाकडे लक्ष दिल्यास जप झाला असा अर्थ होतो. मग तो माळ घेऊन जप करताना न दिसेना का. म्हणजे असे :-

मानव मरेपर्यंत श्वासोच्छ्वास करतो. श्वासोच्छ्वासात रामनामाचा - चैतन्याच्या नादाचा - ध्वनी उमटत आहे (रामनाम ध्वनी उमटे). हा जप चोवीस तास चालू असतो. संपूर्ण दिवसात २१६०० इतके श्वासोच्छ्वास होतात. या श्वासोच्छ्वासाकडे लक्ष दिले की जप झाला असा अर्थ होतो. जसे, रुद्रपठणाचेवेळी एक ब्राह्मण मंत्र म्हणत असतो आणि बाकीचे तो ऐकत असतात. त्यांनी ऐकल्यामुळे त्यांनी पठण केले असेच मानले जाते. त्याप्रमाणे येथे आहे. मानवी श्वासात सदोदित रामनामाचा जप चालू आहे. त्याचेकडे लक्ष दिले की तितका जप झाला असा अर्थ होतो. असा माणूस माळ घेऊन जप करताना दिसत नाही, तरी बिघडत नाही. त्याचे लक्ष जर श्वासाकडे असेल तर तो जप करीत आहे असाच अर्थ होतो.

प्राचीन साहित्य व पुराणे यात असे सांगितले आहे की काही तपस्वी लोक शरीर-कष्टरूपी तप करून ईश्वराची आराधना करीत. उदा. एक हात वर करून एका पायावर उभे रहाणे, पाच अग्नींच्या सान्निध्यात रहाणे इत्यादि, त्या तपाचे प्रकार सांगितले गेले आहेत. असे तपाचे प्रकार आवश्यक नाहीत, असे आधुनिक संतसज्जनांचे मत आहे. त्यांचे मते सदोदित नामजप करणे हेच तप आहे. म्हणजे श्वासोच्छ्वासात जो जप सदा चाललेला आहे, ज्याला अजपाजप म्हणतात, त्याचेकडे लक्ष दिले तर

तेच तप होते. शारीरिक कष्ट इत्यादि घेऊन तप करण्याची जरुरी नाही. जप हेच तप आहे. असा अजपाजप जर होत असला तर जगात जे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पाच विषय/पदार्थ आहेत, त्यांच्या विषयी नावड (अनुताप) निर्माण होते. किंबहुना विषयात वैराग्य प्राप्त झाले तरच शरीरात सदोदित चालू असणाऱ्या जपाकडे माणसाचे लक्ष लागू शकते. वैराग्य नसेल तर मन पुनःपुनः विषयांकडे धाव घेईल आणि मग सदा चालणाऱ्या नामजपाकडे लक्ष रहाणार नाही. एवंच वैराग्यपूर्वक सदोदित चाललेल्या नामाचा जप करणे हेच तप आहे.

अशाप्रकारे सदोदित चालणाऱ्या जपाकडे लक्ष देणारे जे ''जपी'' म्हणजे जप करणारे आहेत तेच खरे ''तपी'' आहेत. अशा जप करणाऱ्यांनाच ईश्वराचे दर्शन/प्राप्ती होते. श्वासात उमटणारे नाम म्हणजे चैतन्याचा नाद आहे; तेच नाम परमार्थात रूप आहे (नाम तेचि रूप). म्हणजे चैतन्याचे नाम हस्तगत झाले की चैतन्याचे रूप म्हणजेच ईश्वराचे/ आत्म्याचे रूप दिसून येते. म्हणून असा अजपाजप ज्यांना साधतो त्यांनाच ईश्वररूपाची/ आत्मरूपाची प्राप्ति होते आणि आत्मरूपाची प्राप्ति/दर्शन म्हणजेच आत्मरूप होऊन जाणे आहे.

शेवटी दासराममहाराज सांगतात, ज्यांनी वरीलप्रमाणे सदोदित नामजप केला, त्यांनाच आत्मरूप प्राप्त झाले. ज्यांना आत्मरूप प्राप्त होते तेच खरे आत्मसाक्षात्कारी साधुसंत होत. नामजपाने साधुसंतांना आत्म्याचे दर्शन होऊन ते आत्मरूपाकार होतात. कारण या आत्म्याला पहाणे म्हणजेच आत्मरूपाकार होणे असा अर्थ आहे आणि हीच गोष्ट चिमड संप्रदायातील साधुसंतांनी, दासरामांचे गुरु कोटणीसमहाराज यांनी दासराममहाराजांना सांगितली आणि असा नामजप करून दासरामही आत्मरूपाकार होऊन गेले.

यावरून सामान्य मुमुक्षु साधकांनी असा बोध घ्यावयास हवा :- जगातील फालतू गोष्टींकडे लक्ष न देता, साधकांनी श्वासोच्छ्वासात सदोदित चाललेल्या नामाकडे लक्ष द्यावयास हवे. त्यांनी तसे केल्यास त्यांना आत्मदर्शन होऊन ते आत्मरूपाकार होऊन जातील.

***

## ९.

**तीर्था जावोनिया आठवले ब्रह्म ।**
**तेथे काय काम आम्हा तरी ।।१।।**
**ब्रह्म आठवले हे तो खरे नव्हे ।**
**परी जगी व्हावे ब्रह्मरूप ।।२।।**
**ऐसा तो उपाव सांगा संतजन ।**
**जेणे वर्म खूण ठायी पडे ।।३।।**
***दासरामा*लागी नामाचा उपाय ।**
**जेणे तरणोपाय जड जीवा ।।४।।**

भारतात तीर्थक्षेत्रांचा सुकाळ आहे. भारताच्या चारी दिशेला तीर्थक्षेत्रे आहेत. पूर्वीपासून तीर्थयात्रेला जाण्याची आपल्याकडे पद्धत आहे. सध्या काही लोक सहल (ट्रिप) म्हणून तीर्थक्षेत्रांना जाताना आढळतात. असले सहल करणारे लोक येथे अभिप्रेत नाहीत. तर आपल्या पापाचे क्षालन होऊन पुण्य पदरात पडावे या हेतूने तीर्थक्षेत्री जावयाचे असते. तीर्थक्षेत्रात बुडी मारून पाप जाते आणि पुण्य मिळते अशी समजूत आहे. काही लोकांना असे वाटते की, तीर्थक्षेत्री जाऊन ब्रह्माचा आठव होतो. उदा. काशीला गेले की शंकराची स्मृति होते, इत्यादि. ब्रह्म हे अंतिम सत्य तत्त्व आहे. ते ब्रह्म मोठे/महत्त्वाचे आहे. ब्रह्म शब्द बृंह् या संस्कृत धातूपासून साधलेला आहे. बृंह् म्हणजे सर्वात मोठे असणे. ''ब्रह्म आठवले'' याचा आणि एक अर्थ असा होऊ शकेल. पूर्वीच्या काळी तीर्थक्षेत्री जाणे हे

अतिशय कष्टाचे, त्रासाचे काम असे. ते कष्ट सोसता सोसता 'ब्रह्म आठवे' असे म्हटले जाई. येथे रक्षणकर्ता या अर्थाने ब्रह्म शब्द वापरला जाई.

दासराममहाराज म्हणतात, आमच्यासारख्या मुमुक्षूंना तीर्थक्षेत्री जाऊन काय उपयोग आहे? म्हणजे असे :- मोक्षासाठी पाप आणि पुण्य हे दोन्हीही नको आहेत. मग तीर्थाला जाऊन पापाचा नाश व पुण्याची प्राप्ति करून घेण्यात काय अर्थ आहे? खऱ्या साधकाला तीर्थक्षेत्रांचा काहीच उपयोग नाही. फक्त तेथे जाण्याचा नुसता आटापिटा मात्र पदरात पडेल.

कुणी म्हणेल :- आम्हाला तीर्थक्षेत्री गेल्यावर ब्रह्माची आठवण येते. यावर दासराम सांगतात :- नुसते ब्रह्म आठवणे याचा काय उपयोग आहे? नुसते ब्रह्माचे स्मरण होऊन काही फायदा होत नाही. कारण मानवी जीवनाचे ध्येय ब्रह्माचे स्मरण नसून, ब्रह्मरूप होणे हे आहे. तीर्थक्षेत्रात जाऊन ते जर साध्य होत नसेल तर तेथे जाऊन ब्रह्माचा आठव करून, मग तेथेच ब्रह्माला विसरून जाण्यास काय मतलब आहे? मग हे ब्रह्म आठवणारे लोक साक्षात्कारी संतांना विचारतात :- अहो संत सज्जनहो, ज्याच्यामुळे वर्माची खूण कळेल म्हणजे ज्याच्यामुळे तुम्ही म्हणता त्याप्रमाणे ब्रह्मरूप होता येईल, असा उपाय तुम्ही आम्हाला सांगा.

चिमड संप्रदायातील ब्रह्मसाक्षात्कारी साधुसंतांनी उपाय सांगितला आणि तो दासराममहाराजांना कळून आला. आणि हा उपाय या जगातील अज्ञानी जडजीवांना ब्रह्म होण्यास उपयोगी पडणारा आहे. हा उपाय म्हणजे नामाचे स्मरण हा उपाय होय.

नुसते ''ब्रह्म, ब्रह्म'' म्हणून अथवा ब्रह्माचे स्मरण करून माणूस ब्रह्मरूप होऊ शकत नाही. जसे, 'टेबल टेबल' म्हटल्याने माणूस टेबल होत

नाही. साक्षात्कारी संतांचे मते, ब्रह्मरूप होण्यासाठी 'नाम' हा उपाय आहे. अर्थात् हे नाम कोणते ते मात्र संतांचे कडून जाणून घ्यावयास हवे. नुसते तोंडाने ''राम राम'', ''ब्रह्म, ब्रह्म'' ''रामकृष्णहरी'' ''विठ्ठल विठ्ठल'' असे म्हणून ब्रह्मरूप होता येत नाही. ब्रह्म म्हणजे आत्मा. ब्रह्म/आत्मा हा चैतन्यरूप आहे. मानवी देहात चैतन्यरूप ब्रह्म/आत्मा आहे. त्याला अंतरात्मा म्हणतात. आत्म्याचे हे चैतन्य माणसाच्या श्वासोच्छ्वासात आहे. माणसाच्या श्वासोच्छ्वासात आत्मचैतन्याचा नाद घुमत आहे आणि श्वासोच्छ्वासातील हे चैतन्याचे नाम म्हणजेच खरे तत्त्वरूप नाम आहे. रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे, ''नाम श्वासोच्छ्वासी असे''. या नामाचा उच्चार करता येत नाही. पण हा चैतन्याचा नाद/नाम ऐकता ऐकता, त्याच्याशी एकरूप होता येते आणि हाच खरा ''नामाचा उपाय'' आहे. परमार्थातील नाम हेच रूप आहे (नाम तेची रूप रूप तेची नाम). चैतन्याचा नाद/नाम म्हणजेच चैतन्याचे रूप आहे. चैतन्याच्या नादाशी एकरूप झाले की चैतन्याच्या रूपाशी एकरूप झाले असा अर्थ होतो. चैतन्य म्हणजेच ब्रह्म/आत्मा आहे. म्हणून श्वासोच्छ्वासातील चैतन्याच्या नादरूप नामाने जीव ब्रह्मरूप होतो. ब्रह्मरूप होणे हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे.

नामाच्या उपायाने ब्रह्मरूप होण्याचा मार्ग चिमडसंप्रदायातील संतांनी सांगून ठेवला आहे.

***

## १०.

**पंचभूतांची तो झाली झडपण ।**
**काय ते स्मरण होवो लागे ।।१।।**
**काय ते स्मरण होत असे काय ।**
**तेथे तरी काय आहे माझे ।।२।।**
**रामाचे भूताचे असेची वाकडे ।**
**हेचि एक कोडे वाटे जीवा ।।३।।**
**जयाची सुटका तयाची सुटका ।**
**ऐसा भाव निका संतजनी ।।४।।**
**साधिलिया वर्म घडे जे स्मरण ।**
**तेचि नामस्मरण *दासरामी* ।।५।।**

रामाच्या/आत्म्याच्या साक्षात्कारासाठी नामस्मरण हा उपाय आहे असे मागील ९ व्या अभंगात सांगून झाले. मग प्रश्न असा :- हे नामस्मरण केव्हा होऊ शकते? याचे उत्तर आहे :- जेव्हा पंच भूतांचा निरास होतो, तेव्हा नामस्मरण होऊ लागते. येथे पंच भूते म्हणजेच आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी ही पाच महाभूते अपेक्षित आहेत. परंतु बाह्य जगातील पाच महाभूतांचा निरास येथे अभिप्रेत नाही, कारण तो करणे आपणास शक्य नाही. पाच महाभूतांनी बनलेले हे जे मानवी शरीर त्याचा निरास अपेक्षित आहे. आता या देहाचा निरास म्हणजे नाश अपेक्षित नाही. कारण देहाचा नाश झाला तर स्मरण कसे होणार? तेव्हा देहाचा

निरास म्हणजे देहभानाचा विसर. नेहमी देह/शरीर म्हणजे मी अशी माणसाची भूमिका असते. ही भूमिका दूर होऊन, नामस्मरण व्हावयास हवे. देहाकडे लक्ष न देता नामस्मरण व्हावयास हवे.

आत्मसाक्षात्कार घडवून आणणारे नामस्मरण या देहातच आहे. देहात (काय) श्वासोच्छ्वास आहे. श्वासोच्छ्वासात आत्मचैतन्याचा नाद म्हणजेच नाम घुमत आहे. देहातील हे नामस्मरण अपेक्षित आहे. त्यासंदर्भात, ''माझे'' म्हणजे माणसाचे काही काम नाही. कारण ते नाम ईश्वराने देहातच ठेवलेले आहे, ते चालूच असते. तेथे माणसाने सुरू करणे ही गोष्ट नाही. त्या नामाकडे आपण लक्ष द्यावयाचे आहे. असे लक्ष दिले की नामस्मरण झाले असा अर्थ होतो, हे मागे सांगून झाले आहे.

रामनामाने भूतबाधा टळते, भुताची भीती वाटत नाही असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. ते कसे काय असे कोडे जीवाला वाटते. पण त्यात कोडे काही नाही. श्वासातील रामनामाचे स्मरण झाले की भुताची बाधा होत नाही. येथे 'भूत' शब्दाने पंचभूतातील भूत अपेक्षित आहे. रामनामाचे स्मरणात लक्ष गुंतले की पंचभूतात्मक शरीराची बाधा/त्रास म्हणजे जाणीव उरत नाही. म्हणजे रामनामाच्या स्मरणाने पंचभूतात्मक देहाचे भान सुटते. हेच रामनामाचे सामर्थ्य आहे.

जन्माला आल्यापासून माणूस जगातील व्यवहारात गुंतलेला आहे. देह, इंद्रिये, त्यांचे विषय, देहाअंती येणारे नातेवाईक, त्यांचे प्रेम, द्वेष इत्यादि हे सर्व देहाअंती माणसाचे मागे लागतात. कर्माअंती माणूस जन्ममरणाच्या फेऱ्यात गुंतलेला आहे. त्यातून सुटून ईश्वरप्राप्ती करून घ्यावयाची आहे. तेव्हा व्यवहारात, संसारात अडकलेला म्हणजे बंधनात पडलेला हा जो जीव, त्याची बंधनातून सुटका होऊन, त्याला मोक्ष

मिळवावयाचा आहे, असे साधुसंतांचे म्हणणे आहे. मोक्ष म्हणजे तरी काय? आत्मसाक्षात्कार होऊन जीव आत्मरूप होणे, हाच मोक्ष आहे. हा मोक्ष मिळाला की माणसाचे नवीन नवीन देहधारण म्हणजे जन्म आणि मग मरण हे बंद होते आणि जीवनात जे प्राप्त करून घ्यावयाचे आहे, ते जीवाला प्राप्त होते. नामस्मरणाने हे सर्व घडते असे साधुसंत सांगतात.

आता प्रश्न असा :- नामस्मरण म्हणजे नक्की काय? आपण तोंडाने नाम म्हणतो अगर मनात उच्चारतो, पण ते नामस्मरण आत्मसाक्षात्कारासाठी उपयोगी पडत नाही. जे नामस्मरण आत्म्यापर्यंत नेते, त्या नामस्मरणाचे एक वर्म आहे. ते वर्म कळून जर नामस्मरण झाले तर ते नामस्मरण आत्मसाक्षात्कार घडवून आणते. हे नामस्मरणाचे वर्म आहे तरी काय? ते असे :- प्रत्येक माणसाबरोबर त्याच्या जन्मापासून ईश्वराने नाम देऊन ठेवले आहे. माणसाचे जीवन श्वासांवर अवलंबून आहे. या श्वासोच्छ्वासात ईश्वराने नाम ठेवलेले आहे, हे नाम म्हणजे चैतन्याचा नाद. श्वासोच्छ्वासात आत्मचैतन्याचा नाद उमटत असतो.आत्मचैतन्याचा नाद/ध्वनी श्वासात उमटत असतो (रामनाम ध्वनि उमटे). हे नाम चोवीस तास चालूच असते. पण हे नाम आपणास माहीत नसते. गुरू किंवा संत या नामाचा बोध करून देतात आणि त्या नामाचे स्मरण कसे करावयाचे हे सांगतात. श्वासोच्छ्वासातील नामाच्या ध्वनीकडे लक्ष देणे म्हणजेच नामस्मरण आहे. मग गुरूंनी सांगितल्याप्रमाणे जे नामस्मरण होते ते खरे नामस्मरण आहे. असे नामस्मरण गुरूच्या कृपेने दासरामांना कळले आणि त्यांनी ते केले. आणि या नामस्मरणाच्या उपायाने दासराममहाराज साक्षात्कारी झाले. दासरामांना आत्म्याचा, ईश्वराचा साक्षात्कार झाला आणि ते ईश्वररूप / आत्मरूप होऊन गेले.

***

## ११.

**दुजेमाजी भ्रांती ते काय वसती ।**
**म्हणोनिया शांती स्वरूपीया ।।१।।**
**गुरुलिंगजंगम निमज्जोनि मग्न ।**
**व्हावे जी निमग्न आत्मरूपी ।।२।।**
**वैकुंठाहोनी आले हे अमृत ।**
**सेविताचि तृप्त होय जीव ।। ३।।**
***दासरामा*लागी हनुमंत कृपा ।**
**तेणे मार्ग सोपा चिन्मयाचा ।।४।।**

या जगात माणूस जन्माला आला. तो मरेपर्यंत या जगात वावरत असतो. या जगात काय आहे? या जगात सर्वत्र दुजेपणा/द्वैत आहे. मी-तू हे तर द्वैत रोजच्या जीवनात असते. तसेच ते जगातही आहे. जगात नाना विषय आहेत. ते विषय/पदार्थ परस्परापेक्षा तसेच आपणापेक्षा वेगळे आहेत. भोग्य आणि भोक्ता, ज्ञेय आणि ज्ञाता असा संबंध ते पदार्थ आणि आपण यामध्ये आहे. म्हणजे येथे सर्वत्र दुजेपण/द्वैत/अनेकत्व/नानात्व आहे. येथे सर्वत्र भेद/भिन्नता आहे. जगात सर्व एकच आहे असे कुठेही होत नाही आणि कुणी मानीतही नाही. अशा या द्वैतात्मक जगात जीव रहातात. परंतु या द्वैतामुळे माणसाला सुख/शांती/समाधान/आनंद मात्र प्राप्त होत नाही.

हे जग ईश्वराने निर्माण केले. ईश्वर एकमेव एक आहे आणि तो आनंद-स्वरूप आहे. हे आनंदरूप ईश्वरस्वरूप/ आत्मस्वरूप जर आपणास कळले तर त्या एका ईश्वरात सुख/शांती/समाधान आहे, हे जीवाने जाणून घ्यावयास हवे. नाही तर द्वैतात्मकच जगातील लाथाळी, दुःख, त्रास/खेद मरेपर्यंत चालूच रहाणार.

असा ईश्वर जाणून ईश्वररूप झाले तर आपणास शांती/आनंद मिळणार आहे. ईश्वररूप कसे व्हावयाचे याचा उपाय चिमडसंप्रदायाच्या प्रवर्तकांनी सांगितला, असे दासराम येथे सांगतात. चिमड संप्रदायाचे प्रवर्तक होते गुरुलिंगजंगम ऊर्फ नारायणराव भाऊसाहेबमहाराज निंबरगीकर. त्यांनी शरण आलेल्या भक्तांना ईश्वरस्वरूप होण्याचा उपाय/मार्ग सांगितला. कारण ते स्वतःच आत्मस्वरूपात/ईश्वररूपात निमग्न झालेलेले होते. काडसिद्ध या गुरूंच्या कृपेने त्यांना आत्मानंद प्राप्त झाला होता. त्या गुरुलिंगजंगम स्वामींप्रमाणे अन्य जीवांनीही ईश्वरस्वरूपात निमग्न होणे आवश्यक आहे, तसे होणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. हे समजून मानवाने ईश्वररूप व्हावयास हवे.

गुरुलिंगजंगमांनी आत्मस्वरूपाशी/ईश्वराशी एकरूप होण्याचा उपाय/मार्ग मुमुक्षुजनांपुढे प्रगट केला. हा उपाय ईश्वरप्राप्ती म्हणजेच मोक्षप्राप्ती म्हणजेच अमृतत्त्व प्राप्त करून देणारा आहे. येथे अमृत म्हणजे अमृत/मोक्षप्राप्ती असा अर्थ आहे. हे अमृत म्हणजे अमृतप्राप्तीचा उपाय गुरुलिंगजंगमांनी वैकुंठाहून आणला असे येथे म्हटले आहे. वैकुंठ म्हणजेच ईश्वर/परमात्मा/आत्मा. म्हणजे ईश्वरानेच हा अमृतप्राप्तीचा उपाय जगाच्या कल्याणासाठी गुरुलिंगजंगमांना सांगितला. गुरु हा ईश्वररूप असतो. म्हणून ईश्वररूप गुरूने - काडसिद्धांनी - हा उपाय गुरुलिंगजंगमांना सांगितला. या

उपायाचा जीवाने वापर केला तर तोही तृप्त/शांत/समाधानी होऊन जातो.

हा अमृत-उपाय काय आहे? हा उपाय गुरुलिंगजंगमांनी दासरामांना श्रुत केलेल्या गुरुलिंगगीतेत सांगितला आहे. ते म्हणतात, ''श्वासोच्छ्वास हा आत्मप्राप्तीचा/ परमेश्वरप्राप्तीचा राजमार्ग आहे.'' येथे श्वासोच्छ्वास शब्दाने श्वासोच्छ्वासात सतत उमटणारा चैतन्याचा नाद/ चैतन्यरूप ईश्वराचा नाद आहे. हा चैतन्याचा नाद म्हणजेच तत्त्वरूप, खरे खुरे नाम आहे. या चैतन्याच्या नादात जर माणसाचे मन एकरूप झाले तर माणूस ईश्वररूप/ चैतन्यरूप होऊन जातो. चैतन्य हे आनंद आहे. म्हणून चैतन्यरूप झालेला जीव शांति, सुख, समाधान, आनंद प्राप्त करून घेतो. या चैतन्यरूप नामाच्या सेवनाने म्हणजे नामाच्या अभ्यासाने/स्मरणाने जीव ईश्वररूप / आनंदरूप होऊन जातो.

गुरुलिंगजंगमस्वामींनी सांगितलेला हा उपाय चिमड संप्रदायात गुरु-शिष्य परंपरेने दासरामाप्रत पोचला तो असा ः- गुरुलिंगजंगमांचे पट्टशिष्य होते रघुनाथप्रिय साधुमहाराज. साधुमहाराजांचे शिष्य होते चिमडचे रामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज. चिमडमहाराजांचे शिष्य होते. हनुमंत म्हणजे हनुमंत ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज. या कोटणीसमहाराजांनी दासरामांना त्यांच्या वयाच्या चौदाव्या दिवशी दृष्टिद्वारा अनुग्रह देऊन हा उपाय/मार्ग त्यांचे मनात प्रगट केला आणि कोटणीसमहाराजांनीच कृपा करून दासरामांच्या नामसाधनाची पूर्तता करून दिली आणि दासराममहाराज ईश्वररूप/चैतन्यरूप/आनंदरूप सिद्ध झाले. म्हणून दासराममहाराज म्हणतातः- चिन्मय/चैतन्यरूप होण्याचा हा मार्ग मला कोटणीसमहाराजांच्या कृपेने कळला आणि तो तडीस गेला.

असा सोपा मार्ग मला गुरुकृपेने साध्य झाला. या साधनाची/उपायाची सिद्धता होऊन गुरुकृपेने मी जगातील द्वैतातून सुटलो, देहभानातून सुटलो, ईश्वररूप झालो, चैतन्यरूप झालो, आत्मरूप झालो. मला सततची शांति, समाधान, आनंद प्राप्त झाला आणि माझ्या जीवनाचे सार्थक झाले.

***

## १२.

**कल्पना सरता होय निर्विकल्प ।**
**कल्पक अपाप भेटो येई ।।१।।**
**कल्पक पाहता कल्पना सरे ।**
**घुमो लागे वारे चैतन्याचे ।।२।।**
**भरता हे वारे होय तदाकार ।**
**मग देहाकार नाठवेची ।।३।।**
**देहाकार जाता नुरे अहंकार ।**
**तोचि साक्षात्कार संतजनी ।।४।।**
**ऐसा जरी झाला एक साक्षात्कार ।**
**आनंदे निर्भर *दासराम* ।।५।।**

आत्मसाक्षात्कार झाल्यावर काय होते याची काहीशी कल्पना या अभंगात दिली आहे. मानवी जीवनात मन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. ''मनात आले तर वाटेल ते होते'' असे म्हटले जाते. ''माझे मन ते करण्यास धजावत नाही'' ''मी मनाने निश्चय केला आहे.'' वगैरे वाक्ये आपण माणसांच्या तोंडून ऐकतो. त्यावरून मानवी जीवनात मन हे अत्यंत महत्त्वाचे आहे, हे कळते. इतकेच नव्हे तर, 'मनाने आत्मा पहावयाचा आहे' (मनसा चैव दृष्टव्यः) असे एक उपनिषद सांगते. मनानेच बंध आहे आणि मनानेच मोक्ष आहे असे दुसरे एक उपनिषद सांगते. इतके लौकिक आणि पारमार्थिक जीवनात मनाचे महत्त्व आहे.

मन म्हणजे काय? संकल्पविकल्प करते ते मन अशी मनाची व्याख्या केली जाते ( संकल्पविकल्पात्मकं मनः । ). म्हणजे मन हे सतत विचार करणारे आहे. ते नानाप्रकारच्या कल्पना करीत असते. मनातील कल्पना जर संपल्या तर मन निर्विकल्प होते. मन निर्विकल्प झाल्यावर कल्पना करणारा भेटावयास येतो. म्हणजे असे :- मनात चैतन्य व जड यांचे अंश आहेत. मनाला प्रेरणा देऊन त्याचेकडून कार्य करवून घेणारा अंतरात्मा आहे. हे मागील एक-दोन अभंगात पाहून झाले आहे. मन हे निर्विकल्प झाले की ते मन 'मन' म्हणून रहात नाही; ते मन अमन/उन्मन होते. आणि या उन्मनी अवस्थेत 'कल्पक' अशा अंतरात्म्याचा साक्षात्कार होतो.

या कल्पक आत्म्याचे दर्शन झाले की मन म्हणून काही उरत नसल्याने, मनात कल्पना येणे ही शक्यता उरत नाही. मग काय होते? अंतरात्मा हा चैतन्यरूप आहे. हा अंतरात्मा प्रगट झाला, या अंतरात्म्याचे दर्शन झाले की मानवी देहात फक्त चैतन्याचे वारे घुमू लागते. कारण आत्मा/अंतरात्मा हा चिद्वायुस्वरूपी आहे असे दासराममहाराजांनी आपल्या अन्य अभंगात सांगितले आहे. भावार्थ असा की, आत्म्याचे दर्शन झाले की शरीरात जडाचे महत्त्व कमी होते आणि चैतन्याला महत्व येते. लौकिक बाजूला पडतो आणि परमार्थ प्रगट होतो.

आत्मरूपी चैतन्याचे असे वारे शरीरात प्रगट झाले की माणूस चिद्रूप,चिद्रूपाकार होतो. जीव हा चैतन्यरूप आहे. हा जीव आत्मचैतन्यरूप होतो. त्या स्थितीत मग त्याला 'देहाकार' आठवत नाही. म्हणजे असे - आत्मसाक्षात्कार होण्यापूर्वी माणूस स्वतःच्या देहाला ''मी'' म्हणजे ''आत्मा'' असे मानीत होता, त्याचे ठायी देहात्मबुद्धी होती. आत्मसाक्षात्कार

होताच ही देहात्मबुद्धी म्हणजे देहाला आत्मा मानण्याची बुद्धी नष्ट होते आणि ''मी आत्मा आहे'' अशी आत्मबुद्धी स्थिर होते. आत्मबुद्धि प्रगट झाली की देहबुद्धि आठवेनाशी होते.

ही देहबुद्धि नष्ट झाली की अहंकार शिल्लक रहात नाही. आत्म्याचा साक्षात्कार होण्यापूर्वी माणसाचे ठिकाणी अहंकार होता. या अहंकाराने माणूस ''मी, मला, माझे'' करीत जगात ताठ्याने, उर्मटपणाने वागत होता. या अहंकाराअंतीच देह म्हणजे मी/आत्मा असे त्याला वाटत होते. देहबुद्धि संपताच त्याचे कारण असणारा अहंकार नाहीसा होतो. दासराम अन्यत्र सांगतात की, अहंकाराचे वारे आहे. शरीरात आत्म्याचे/चैतन्याचे वारे प्रगट होताच हे अहंकाराचे वारे संपून जाते आणि अहंकार संपणे हाच आत्मसाक्षात्कार आहे, असे संत सांगतात. अहंकारामुळेच माणसाला आत्म्याचा साक्षात्कार होत नाही, असे साधुसंतांचे म्हणणे आहे. साक्षात्कार होताच अहंकार नष्ट होतो. किंबहुना अहंकाराचा अभाव म्हणजेच साक्षात्काराचा भाव असे साधुलोक सांगतात.

देहात्मबुद्धि संपली, अहंकार नष्ट झाला, आत्म्याचा साक्षात्कार झाला. मग काय होते? साक्षात्कार झाला की आनंदीआनंद होतो. याचे कारण असे :- अंतरात्मा/आत्मा हा सच्चिदानंद आहे, आत्मा आनंदस्वरूपी आहे. ज्याला आत्मसाक्षात्कार होतो तो आत्मस्वरूप होतो. आत्मा आनंदरूप असल्याने, आत्मरूप झालेला जीव आनंदरूप होतो. आत्मसाक्षात्काराने असा आनंद दासराममहाराजांना झाला आणि ते दुःखरहित, भयरहित, आनंदाने भरलेले, सदा आनंदी झाले. त्यांचे ठिकाणी संपूर्ण आनंद भरून राहिला.

***

## १३.

**एकांती लोकांती देहांतीही नाम ।**
**प्रचीति उत्तम स्वये दिली ।।१।।**
**ऐसे ते गोविंद माझे पितृदेव ।**
**थक्क झाला जीव देखोनीया ।।२।।**
**हनुमंती गोविंद पूर्ण तो आनंद ।**
**जहाले अभेद अद्वैतची ।।३।।**
**अंतरीया खेळे माझा रेवणसिद्ध ।**
**सांप्रदाय बोध *दासरामा* ।।४।।**

सांप्रदाय बोधाच्या या शेवटच्या अभंगात दासरामांनी आपल्या पितृदेव गोविंदांचे गुणवर्णन केले आहे. तसेच त्यांचे हनुमंत सद्गुरूशी कसे अद्वैत झाले हे सांगितले आहे आणि चिमड संप्रदायाचे मूळ जे रेवणसिद्ध त्यांचे स्मरण करून हा सांप्रदायबोध समाप्त केला आहे.

दासरामांचे पिताजी गोविंद अनंत ऊर्फ मामामहाराज केळकर. त्यांचेबद्दल पहिल्या तीन चरणात सांगितले आहे. मामामहाराज हे प्रथमपासूनच ज्ञानेश्वरमहाराजांचे निःसीम भक्त होते. त्यांना आळंदीक्षेत्री श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात दर्शन झाले होते. ज्ञानेश्वरमहाराजांच्या आज्ञेनुसारच त्यांनी विवाह करून प्रपंच करीत परमार्थाची कड गाठली. मरणसमयी मामामहाराजांच्या नाड्या सुटल्या असता, त्यांनी आपल्या नित्य कीर्तनाची पाच ही वेळ होताच ''श्रीराम जयराम जयजय राम'' हा

नामाचा उच्चार उच्चरवाने करून, नामस्मरण म्हणजेच कीर्तन या वाक्यानुसार आपले अंतिम कीर्तन साधले. मामामहाराज एकांती रामनाम घेत यात नवल नाही, पण लोकांमध्ये असताना, कीर्तनाचे वेळीही ते रामनाम उच्चारीत. नाड्या सुटल्यावर म्हणजे देहांत आल्यावरही त्यांनी रामनामाचा उच्चार केला. म्हणजे रामनाम आपल्या अंगी किती भिनले होते याची प्रचीति त्यांनी लोकांना दाखवून दिली. ही गोष्ट थक्क करण्यासारखी होती. दासराम हे आपल्या पित्याला साक्षात गोविंद म्हणजे परमेश्वरच मानीत, ही गोष्ट त्यांच्या मामामहाराजांचेवरील अभंगावरून कळून येते. असे मामामहाराज हे ईश्वररूप होते, असे दासराममहाराजांना सांगावयाचे आहे.

मामामहाराज सांगली गावी रहात. त्यावेळी सांगलीत हनुमंत म्हणजे हनुमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे नित्य कीर्तन करीत होते. त्यांचा उपपदेशानुग्रह घेण्यास मामामहाराज त्यांच्याकडे गेले असता, कोटणीसमहाराजांनी त्यांना त्यांच्या पूर्वनियोजित गुरूंकडे म्हणजे चिमडमठाच्या नारायणमहाराज यरगट्टीकर यांचेकडे अनुग्रहास पाठविले. असे असले तरी मनोमनी मामामहाराज कोटणीसमहाराजांनाच गुरु मानीत. पुढे त्यांच्या आज्ञेनेच मामामहाराजांनी आपले नित्यकीर्तन सुरू केले होते आणि ते त्यांनी अखंडितपणे देहांतापर्यंत पूर्ण करून दाखविले. हनुमद्‌गुरुंचे म्हणजे कोटणीसमहाराजांचे चरित्रही मामामहाराजांनी लिहिले होते. त्यात हनुमद्‌गुरूंच्या आध्यात्मिक जीवनाचा पट त्यांनी मांडला होता. या हनुमद्‌गुरूंच्या कृपाप्रसादाने गोविंदांना - मामामहाराजांना - ब्रह्मसाक्षात्कार होऊन त्यांना पूर्ण आनंद/ब्रह्मानंद मिळाला होता. कोटणीसमहाराज ब्रह्मरूप होते; मामामहाराज ब्रह्मरूप झाले होते. अशाप्रकारे पारमार्थिक दृष्ट्या हनुमंत आणि गोविंद हे गुरुशिष्य एकरूप झाले होते; त्यांचा अभेद झाला होता. त्यांचे अद्वैत झाले होते.

यानंतर दासराममहाराज रेवणसिद्धांचेकडे वळतात. दासराम हे ज्या चिमड संप्रदायाचे तो संप्रदाय रेवणसिद्धांपासून सुरू झाला होता आणि रेवणसिद्ध म्हणजे साक्षात् भगवान शंकर अशी दासराममहाराजांची भूमिका होती. रेवणसिद्धांनी दासरामांना स्वप्नात दर्शन देऊन, त्यांच्या कपाळी विभूति/भस्म लावले होते. या प्रसादाचा परिणाम म्हणून दासरामांना रेवणसिद्धांचा महिमा गाणारे काही अभंग स्फुरले. त्या अभंगसमूहाला त्यांनी रेवणसिद्ध पाठ असे नाव दिले. हा रेवणसिद्ध पाठ दासरामगाथा या ग्रंथातून प्रकाशित झाला आहे. रेवणसिद्धपाठात दासरामांनी भिन्न भिन्न प्रकारांनी रेवणसिद्धांचा महिमा वर्णन केला आहे. पुढे एकदा हे रेवणसिद्ध दासरामांच्या मनात प्रगट झाले. जणू ते त्यांच्या मनात खेळ करण्यास अवतरले होते. त्यांच्या कृपेनेच चिमड संप्रदायातील संतांनी केलेला बोध दासराममहाराजांच्या मनात प्रगट झाला आणि मग तो त्यांनी सांप्रदाय बोध या शीर्षकाखाली तेरा अभंगात संगृहीत केला.

अशाप्रकारे गोविंद/मामामहाराज केळकर, हनुमंत म्हणजे तात्यासाहेबमहाराज कोटणीस आणि रेवणसिद्ध यांचे विषयी कथन करून दासराममहाराजांनी सांप्रदाय बोध समाप्त केला.

***

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २४ | **ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | **अभंगदरबार (आवृत्ती १)** | २०११ |
| २७ | **सद्‌बोध दशक** (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** | २०११ |
| २९ | **श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | **प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३१ | **पाठांतर सुलभ भगवत्‌गीता** | २०११ |
| ३२ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे** | २०११ |
| ३३ | **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३५ | **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र** | २०११ |
| ३६ | **तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०१२ |
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१३ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४८ | **श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | **स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | **चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | **श्रीमद्‌दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्‌गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |